महाराष्ट्र शासन,
गृह विभाग,
शासन निर्णय क्र. आरसीटी. ०३९१/सीआर-२२०/पोल-५[अ],
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक २९ सप्टेंबर १९९२.

वाचा :-

१] पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे दिनांक नसलेले पत्र क्र. २३/६७५५/एआयसीडीएस/९१.

२] शासन निर्णय, गृह विभाग क्र. आरसीटी. ०३९१/सीआर-२२०/पोल-५[अ], दिनांक ५.८.१९९२ ने निर्गमित केलेले आदेश रद्द करण्यांत येत आहेत व असे आदेश देण्यात येत आहेत की :-

शासन निर्णय :-

पोलीस विभागाची कार्यपध्दती, पुनर्रचना किंवा पोलीस विभागाशी संबंधित इतर विषयावर सध्या केले जात असलेले संशोधन शासकीय धोरण ठरवितांना फारसे उपयुक्त ठरत नाही. बहुदा असले संशोधन तत्कालीन उपाय-योजना करण्याच्या स्वरूपाचे असते, परिणामी त्यांचा दीर्घकालीन धोरण आंखणीसाठी वापर करता येत नाही. सध्या केले जाणारे संशोधन हे व्यवसायातील व्यक्तींमार्फत किंवा सामाजिक संस्था, इतर संशोधन संस्था, विद्यापीठ इत्यादींना समावेश करून केले जाते. त्यामुळे त्यात पोलीस विभागाच्या उन्नतीच्यादृष्टीने विचार केला जाणाऱ्या बाबींचा अभाव दिसून येतो. तसेच अशा प्रकारचे संशोधन दुरगामी स्वरूपाचे नसते. स्वतःची स्वतंत्र संशोधन संस्था नसल्यामुळे या विभागाच्या कार्याचा व अडचणींचा प्रदीर्घ अनुभव असणाऱ्या सेवा निवृत्त पोलीस अधिकाऱ्यांच्या अनुभवाचा व सल्ल्याचा लाभ घेता येऊ शकत नाही. या परिस्थितीत सुधारणा करून शास्त्रशुध्द पध्दतीने संशोधन करण्यासाठी व प्रामुख्याने सेवा निवृत्त पोलीस अधिकारी यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा उपयोग करून घेण्यासाठी एका नवीन संशोधन संस्थेच्या स्थापनेबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी पाठविलेला प्रस्ताव शासनाने मान्य केला असून सदर संस्थेची रूपरेषा खालीलप्रमाणे राहील :-.

१] संस्थेचे नांव : पोलीस संशोधन केंद्र [Centre for Police Reserach) ]

२] संस्थेचे नोंदणीकृत कार्यालय. : पुणे.

३] उद्देश : संस्था खालीलप्रमाणे कार्य करील :

अ] गुन्हेसंबंधी मुलभूत व उपयुक्त संशोधन [Fundamental ] and Applied Research)

ब] गुन्हेविषयी संबंधित कर्मचाऱ्याचे प्रशिक्षण.

क] गुन्हेविषयी साहित्य व प्रचार साहित्य निर्मिती.

ड] गुन्हेविषयी चर्चासत्रे, औद्योगिक प्रदर्शने, साहित्य व चित्रपट इत्यादींव्दारे लोकशिक्षण.

सदर संस्था ही संस्था निबंधक [Registrar of Societies ] यांचेकडे आपली नोंदणी करुन घेईल.

सदर संस्थेवर खालील व्यक्ती पदसिध्द [Ex-officio ] अधिकारी संस्थेचे प्रमुख आश्रयदाते म्हणून राहतील.

१] मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
२] वित्त मंत्री, महाराष्ट्र राज्य,
३] गृह राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
४] मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,
५] अपर मुख्य सचिव [गृह]

सदर संस्था ही शासनमान्य संस्था राहील व तिचे संचलन आणि नियंत्रण महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या सेवानिवृत्त पोलीस महासंचालक यांचेकडे राहील. सदर सेवानिवृत्त पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य हे संस्थेचे संचालक [Director ] म्हणून काम पाहतील. खालील व्यक्ती सदर संस्थेचे पदसिध्द सदस्य व अधिकारी राहतील :-

| | | | |
|---|---|---|---|
| १] | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य | = | सदस्य |
| २] | प्रधान सचिव [गृह], महाराष्ट्र राज्य | = | सदस्य |
| ३] | विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हा अन्वेषण विभाग [गुन्हे], पुणे. | = | कार्यकारी संचालक. |
| ४] | पोलीस आयुक्त, पुणे | = | सदस्य |
| ५] | पोलीस उपमहानिरीक्षक, राज्य गुन्हे अभिलेख केंद्र, पुणे. | = | सदस्य |
| ६] | पोलीस अधीक्षक [कायदा व संशोधन ] गुन्हा अन्वेषण विभाग [गुन्हे], पुणे. | = | सदस्य सचिव. |

सदर संस्थेवर अधिक इतर तीन सदस्य नेमण्याचे अधिकार संचालकांस राहील. या केंद्राचा दैनंदिन कारभार कार्यकारी संचालक हे संचालकाच्या नियंत्रण व मार्गदर्शनाखाली चालवतील. वेळोवेळी संबंधित अधिकारी संस्थेच्या कार्यात मदत करतील.

संस्थेच्या उद्देशांची उपयुक्तता लक्षात घेता शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

अ] संस्था ही अधिकृत व सरकार पुरस्कृत मानण्यात येईल.
ब] मुख्यमंत्र्यांच्या निधीतून पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना पूर्वीच देण्यात आलेली रु. १० लाखांची देणगी व त्यावरील साठलेल्या व्याजासहीत रक्कम संस्थेकडे संस्थेचा निधी म्हणून वर्ग करण्यात येईल.
क] सरकारी व निमसरकारी संस्था सदर संस्थेच्या उद्देशानुरुप आपले विभागाशी संबंधित संशोधन, शिक्षण, साहित्य निर्मिती, प्रचार व लोकशिक्षण इत्यादी कामे अग्रक्रमाने सदर संस्थेस देतील, असे शासनाचे धोरण राहील.

ड) वर निर्देशित व्यवस्थेप्रमाणे शासकीय अधिकाऱ्यांना संस्थेचे पदाधिकारी म्हणून काम करण्यास शासनाची मान्यता राहील.

इ) सदर संस्थेस वरील "क" प्रमाणे काम देतांना तीन निविदा मागविण्याची आवश्यकता राहणार नाही.

फ) संस्थेचे वर निर्देशित उद्देश व शासनाचे धोरण या अनुषंगाने नियम व कार्यप्रणाली ठरविण्याचे अधिकार संस्थेस राहतील.

संस्थेच्या कामासाठी सर्व संबंधित खाती आवश्यकतेनुसार वेळोवेळी सर्वतोपरी मदत करतील. त्यात तात्पुरती जागा उपलब्ध करून देणे, आपले संदेशवाहन, वाहन इत्यादींचा वापर करून देणे, रेकॉर्ड उपलब्ध करून देणे, संबंधित अधिकारी कामासाठी व चर्चेसाठी उपलब्ध करून देणे इत्यादी, अशा बाबींचा समावेश राहील. मात्र या सर्व बाबी संबंधित खात्याच्या धोरणाशी विसंगत असू नयेत.

संस्थेकडून घ्यावयाच्या कामाकरिता द्यावयाच्या मोबदल्यासाठी संबंधित खाती आपल्या अंदाजपत्रकात वेळोवेळी तरतूद करतील. कामासाठी होणारा संस्थेचा वाजवी व व्यावसायिक खर्च भरून निघेल व सर्वसाधारण खर्चासाठी तशी रक्कम शिल्लक राहील अशाप्रकारे संस्थेचे मोबदला आकारण्याचे सर्वसाधारण धोरण राहील.

श्री. व्ही. के. सराफ, सेवानिवृत्त पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची संस्थेचे संचालक म्हणून तात्पुरती नेमणूक करण्यात येत आहे.

वरील निर्णय सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ नु. अ. मुल्ला ].
अवर सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रत:-

मंत्रालयातील सर्व विभाग,
महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व पोलीस उप महानिरीक्षक,
सर्व पोलीस अधीक्षक,
महालेखापाल [१], मुंबई,
महालेखापाल [२], नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

True Copy
15/10/98

Addl. Supdt of Police
C.I.D. (Crime) Head Qrts.
M.S. Pune-1.